आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. महिलांनी महायुतीला आशिर्वाद दिला तर लाडकी बहीण योजने अंतर्गत रकमेत वाढ करण्यास राज्य सरकार सक्षम: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये नागपूरात प्रतिपादन.
2. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सल्लागाराची भूमिका बजावण्याच्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सूचना, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा ‘स्थानिक स्वराज्य संस्था दिवस सोहळा संपन्न.
3. पर्यटन क्षेत्रात राज्याला आघाडीवर नेणार-पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांचे ‘पर्यटन धोरण 2024:ॲडव्हान्टेज विदर्भ कॉन्क्लेव्ह’ मध्ये आश्वासन.
4. उद्या नागपूर, चंद्रपूर, आणि यवतमाळ जिल्हयात अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी.

****

लाडकी बहीण

महिलांनी जर महायुतीला साथ दिली तर मुख्यमंत्री लाडक्या बहिण योजनेअंतर्गत दोन हजाराचे अडीच हजार होतील अडीच हजाराचे तीन हजार होतील **3000** पेक्षा देखील जास्त देण्याचं आमचं सामर्थ्य आहे असं मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूर इथल्या रेशीमबाग मैदानात आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या योजनेच्या दुसरा टप्पा निधी वितरण शुभारंभ आज संपन्न झाला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे प्रामुख्यानं उपस्थित होते. कुठल्याही जाती पंथाचा विचार न करता चांद्यापासून ते बांद्या पर्यंत असणाऱ्या महिलांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठीची मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असल्याचं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केलं .उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की लखपती दीदीच्या माध्यमातून या महिलांना रोजगार मागणाऱ्या नव्हे तर रोजगार देणाऱ्या उद्यमशील महिलांचे आम्ही सक्षमीकरण करत आहोत. याप्रसंगी त्यांनी राज्य सरकारनं केलेल्या विविध

विकासकार्यांचा उल्लेख केला. मुख्यमंत्री लाडकी  बहीण योजना ही महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठीची चांगली योजना असल्याचं गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केलं. राज्य शासनाने महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबीकरण, आत्मनिर्भर करण्याबरोबरच त्यांच्या सशक्तीकरणाला चालना देण्याकरीता 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना सुरू केली आहे. राज्यातील महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील लाभ जमा करण्यात आले आहेत.

****

गडकरी स्थानिक स्वराज्य संस्था

लोकशाही यशस्वी होण्याची सुरवात ग्रामपंचायती पासून होते असे सांगून एकूणच आपल्या यंत्रणांची कामगिरी सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सल्लागाराची भूमिका योग्य बजावावी असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा 'स्थानिक स्वराज्य संस्था दिवस', तसंच नागपूर केंद्राचा रौप्य महोत्सवी सोहळा आज राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, राजनगर इथं आयोजिण्यात आला, होता त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी रौप्य महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. रामदास आंबटकर, राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे संचालक नागेश शिंगणे आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. सांडपाणी, घनकचरा, पिण्याचे पाणी, रस्ते, पुराच्या पाण्याचा निचरा, नाले सफाई या बद्दल लोकांना अनेक समस्या येतात. त्यासाठी त्यांना स्थानिक ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिकेचे खेटे घालावे लागतात. अश्या परिस्थितीत जर स्थानिक स्वराज्य संस्थांनी जागतिक दर्जाची तज्ञ मंडळी, नवनवीन तंत्रज्ञान, यांचा योग्य उपयोग करून शाश्वत, परवडणारे, सोपे मॉडेल सार्वजनिक-खाजगी भागीदारी आधारावर तयार केले, त्या बद्दल योग्य सल्लागारची भूमिका बजावली तर लोकांचा त्रास कमी होईल अश्या  सूचना त्यांनी केल्या. याशिवाय नागपूर केंद्राच्या  रौप्य महोत्सवी वर्षाबद्दल आणि पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

****

राष्ट्रीय परिषद

देशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कडक कायदे लागू केले आहेत. हे कायदे आणखी सक्रीय करायची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. अशा प्रकरणांचे निकाल जितक्या लवकर लागतील, तितकी आपण सुरक्षित असल्याची खात्री महिलांना पटेल, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जिल्हास्तरीय

न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन त्यांनी आज केलं. त्यानंतर ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक विशेष टपाल तिकीट आणि एका नाण्याचं प्रकाशनही मोदी यांच्या हस्ते झालं. सर्वोच्च न्यायालयाचा ७५ वर्षांचा प्रवास लोकशाहीची जननी म्हणून भारताची शान आणखी वाढवतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

****

वंदे भारत

वंदे भारत रेल्वेगाड्यांचा वाढता विस्तार, आधुनिकता आणि वेग हे विकसित भारताच्या दिशेनं पडलेलं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मीरत-लखनौ, मदुराई-बेंगळुरू आणि चेन्नई-नागरकोईल या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना प्रधानमंत्र्यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या गाड्यांमुळे देशातली महत्त्वाची शहरं आणि ऐतिहासिक शहरं जोडली जातील, मंदिरांचं शहर असा लौकिक असलेलं मदुराई, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रणी असलेल्या बेंगळुरूशी जोडलं जाईल, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

****

‘पर्यटन धोरण

‘पर्यटन धोरण-**2024**’ हे देशातील सर्वोत्तम धोरण असून यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, वन, समुद्र, धार्मिक, मेडीकल, साहसी पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यात विदर्भाला झुकते माप कसे देता येईल याचा अधिकाधिक प्रयत्न करण्यात आला असून हे धोरण महाराष्ट्राला देशात आघाडीवर नेणारे ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र शासनाचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. खासदार औद्योगिक महोत्सवांतर्गत असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट च्या वतीनं आयोजित 'पर्यटन धोरण **2024:** ॲडव्हान्टेज विदर्भ कॉन्क्लेव्ह' च्या समारोपीय सत्रात आज ते बोलत होते. ग्रॅंड एअरपोर्ट बॅंक्वेट, साउथ मेट्रो स्टेशन इथ झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते. गिरीश महाजन यांनी राज्यातील पर्यटन वाढीचे श्रेय नितीन गडकरी यांना दिले. ते म्हणाले, नितीन गडकरी यांच्या प्रयत्नांमुळे केवळ महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण देशातील रस्ते चांगले झाल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले आहे. दोन वर्षापूर्वी या खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर चार महिन्यात तयार करण्यात आलेल्या या धोरणात एआयडीचे महत्वाचे योगदान आहे.महाराष्ट्राने जगातले सर्वात उत्तम पर्यटन धोरण आणल्याबद्दल गिरीश महाजन यांचे अभिनंदन करताना नितीन

गडकरी यांनी पर्यटकांना महाराष्ट्रात आकर्षित करण्यासाठी अभिनव कल्पना राबवाव्या, असं आवाहन केलं.

****

हवामान

विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, नागपूर, वर्धा आणि अकोला जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या नागपूर, चंद्रपूर, आणि यवतमाळ जिल्ह्यात अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला असून अमरावती, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान नागरिकांनी विजांपासून पासून बचाव करण्याच्या आणि इतर खबरदारीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना हवामान खात्यानं दिल्या आहेत. दरम्यान, आस्ना या चक्रीवादळाचा प्रवास येत्या चोवीस तासात देशाच्या वायव्य आणि इशान्य भागाकडे सुरू होईल, असं भारतीय हवामान विभागानं म्हटलं आहे. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्राचा मध्य भाग, विदर्भ तसंच कोकण किनारपट्टी आणि गोव्यात पुढच्या आठवड्यात मुसळधार पाऊस पडेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. मोसमी पावसाचा मुक्काम यंदा लांबण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे. रब्बी पिकांना उपयुक्त असणाऱ्या या पर्जन्यमानामुळे रब्बी लागवडीचं क्षेत्रही वाढू शकेल. मराठवाड्यात काही ठिकाणी येत्या चोवीस तासात पाऊस होईल असा विभागाचा अंदाज आहे. जालना जिल्ह्याला तीन सप्टेंबरपर्यंत यलो अलर्ट दिला आहे.

****

मतदार यादी जागृती

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्हा प्रशासनाच्या वतीनं विशेष मोहीम राबविण्यात आली. यात प्रामुख्यानं नवमतदारांची नोंदणी, मयत किंवा स्थलांतरीत मतदारांचे नाव वगळणे, मतदार यादीत त्रृटी असल्यास त्यात दुरुस्ती करणे आदींचा समावेश होता. याची फलश्रृती म्हणून जिल्ह्यात तब्बल **38** हजार **637** मतदारांची वाढ झाली आहे. दरम्यान, बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी जळगाव जामोद तालुक्यातील अतिदुर्गम असलेल्या भिंगारा इथं चुनाव पाठशाळा अंतर्गत आगामी मतदानाबाबत आदिवासी समुदायामध्ये जनजागृती केली. तसेच जिल्हाधिकारी

डॉ.पाटील यांनी जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या गौमाल या आदिवासी पाड्यावर ३ किलोमीटरची जंगलातील खडतर रस्त्यावरून वाट काढत वैयक्तिक वन अधिकार आणि सामाजिक वन अधिकाराबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना केली.

****

प्रादेशिक सेना

संरक्षण मंत्रालयाच्या प्रादेशिक सेना- टेरीटोरीयल आर्मीचा अमृत महोत्सवी वर्ष येत्या ऑक्टोबर महिन्याच्या नऊ तारखेला साजरा होणार आहे यानिमित्ताने प्रादेशिक सेनेमध्ये युवकांना भरती होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता टीए सैनिकांची सियाचीन पासून निघालेली सायकल रॅली उत्तर प्रदेश, दिल्ली, मध्य प्रदेश या राज्यातुन सुमारे **2000** किमी अंतर पार केल्यानंतर आज संध्याकाळी नागपूरच्या गार्ड रेजीमेंट सेंटर कामठी येथे पोहोचली.या रॅलीला उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात मुख्यालयाचे मेजर जनरल एस के विद्यार्थी यांनि हिरवी झेंडी दाखवली. ही रॅली अंदमान निकोबार च्या इंदीरा पॉईंट पर्यंत आपला मार्गक्रमण करणार आहे. याप्रसंगी प्रादेशिक सेनेचे मेजर अभिनव सिंग रावत यांनी या सायकल मोहीमेमागील भूमिका स्पष्ट केली.

*होल्ड बाईट (अभिनव सिंग रावत)*

*हमारे इस एक्सपीडिशन को करने चार प्रमुख कारन है, सबसे पहला कारन है हमारे प्रादेशिक सेना टेरिटोरियल आर्मी के ७५ साल की वर्षगांठ अगले आनेवाले ९ अक्टूबर को है । तो उस वर्षगाठ कमोरेट करने के लिए हमने पहला मकसद ये रखा। दूसरा मकसद ये है की, लद्दाख से लेके अंडमान तक जितने भी हमारे भूतपूर्व सैनिक है उनके परिवार है, वीरांगना है और विडोज़ है उनसे मिलते हुए जाना। तीसरा मकसद है **NCC** कैडेट में जाये और उनके बीच में नेशनल यूनिटी और नेशनल इंटीग्रेशन का मैसेज लेके जाये । और चौथा मकसद ये है की देशवासियो के बीच में सायकल को चलाने की भावना को बढ़ावा दे, इससे सेहद को तो फायदा होता ही है ये पर्यावण के लिए भी अच्छी है ।*

****